माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

तक्रार क्र. ६४/२०१९

तक्रारकर्ता श्री.रामेश्वर इंद्रभानजी पातोंड.
रा.द्वारा प्रेम एस.सेठमाणिक बिक्रियर शाळेजवळ, ता.धारणी, जि.अमरावती
विरुध्द

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
**श्रीराम विद्यालय हरिसाल, ता.धारणी, जि.अमरावती**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्य.),**
**जिल्हा परिषद, अमरावती, ता.जि.अमरावती**
**तक्रार सुनावणी दिनांक - २५.०७.२०२४.**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | अनुपस्थित |
| **जन माहिती अधिकारी** | : | उपस्थित |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | अनुपस्थित |

तक्रारकर्ता यांनी दि.०७.०९.२०१९ रोजी आयोगाचे स्तरावर कलम १८ (१)(ग) अन्वये तक्रार दाखल करुन, दि.०१.०७.२०१९ रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसाच्या विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही तसेच माहिती देखील पुरविली नाही, असे कारण नमुद केले आहे.

प्रस्तुत तक्रारीवर आज दि.२५.०७.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.अनिल देशमुख हे उपस्थित आहेत.

अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०१.०७.२०१८ रोजी रितसर माहितीचा अर्ज दाखल करुन, स्वेच्छा निवृत्ती घ्यावयाची असल्याने त्याकरिता लागणारे कागदपत्रांची यादी बाबत माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांचेकडून ३० दिवसाच्या विहीत मुदतीत माहितीचे प्रदान न झाल्याने तक्रारकर्त्याने आयोगाकडे थेट तक्रार दाखल केल्याचे दिसून येते.

राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या खुलाश्यावरुन असे निदर्शनास येते की, तक्रारकर्ता श्री.पातोंड यांनी दाखल केलेल्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने तक्रारकर्ता यांना प्रदान करावयाच्या सर्व माहितीचे कागदपत्रे याआधिच सादर करण्यात आले असून, त्याची एक प्रत आयोगास देखील सादर करण्यात आली आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, उपरोक्त तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २५.०७.२०२४**

जावक क्रमांक ८२८८ दिनांक 30 OCT 2024

निर्गमित केले
30 OCT 2024

राज्य माहिती आयोग, खंडपीठ अमरावती